| MHBI150006542016 | <u>नियमीत दिवाणी दावा क्रमांक १८८/२०१६ मधील निशाणी क्र.४३ वरील आदेश</u> |
|---|---|

[०१] प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी याने त्याच्याविरुध्द करण्यात आलेला दिनांक २६/०९/२०१९ रोजी निशाणी क्र.४१ वर उलटतपास नाहीचा करण्यात आलेला आदेश रद्द करुन त्यास उलटतपास घेण्याची परवानगी देण्याच्या विनंतीसह सादर केलेला आहे.

[०२] वादीच्या विद्वान वकिलांनी अर्जाच्या पाठीमागील पानावर म्हणणे सादर करत, अर्जास विरोध करत प्रतिवादीचा अर्ज जास्तीत जास्त खर्चावर मंजुर करण्याची मागणी केली.

[०३] अर्जाचे, त्यावरील म्हणण्याचे आणि अभिलेखाचे अवलोकन केले.

[०४] दोन्ही बाजुच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

[०५] प्रस्तुतचा दावा हा वादीने निरंतर मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. म्हणजेच प्रस्तुतच्या दाव्यात दोन्ही पक्षकारांचे स्थावर मिळकतीसंदर्भात हक्क व अधिकारांचा विषय आहे. यात काही एक शंका नाही की, वारंवार संधी दिल्यानंतर देखील वादीचा उलटतपास घेण्यात प्रतिवादीच्या वतीने कसुर करण्यात आलेला आहे. त्यामुळे त्याच्या विरुध्द विना उलटतपास दावा पुढे चालविण्याचा आदेश पारीत केलेला आहे. एकुणच दाव्याच्या स्वरुपाचा, पक्षकारांच्या हिताचा आणि प्रस्तुतच्या दाव्याचा निकाल गुणवत्तेवर होणेसाठी त्यास संधी देणे योग्य होईल. मात्र याठिकाणी आणखीन एक बाब नमुद करणे गरजेचे आहे की, मुळ दावा हा सन २०१६ सालचा असल्यामुळे प्रतिवादी याने कुठल्याही परिस्थितीत पुढच्या तारखेला उलटतपास घेण्याच्या अटीवर प्रस्तुत अर्ज मंजुर करणे न्यायोचित होईल. तसेच त्याच्या वतीने उलटतपास घेण्यासाठी केलेला उशीर योग्य तो खर्च लादुन माफ करता येईल. एकुणच वरनमुद कारणांचा विचार करता, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

# आदेश

(१) निशाणी क्रमांक ४३ वरील अर्ज रक्कम रुपये ५,००/– च्या खर्चावर मंजुर करण्यात येत आहे.

(२) प्रतिवादी विरुध्द पारित करण्यात आलेला विना उलटतपासाचा आदेश कुठल्याही परिस्थितीत पुढील तारखेस निशाणी क्र.४१ वर उलटतपास घेण्याच्या अटीवर रद्द करण्यात येत आहे.

(३) यदाकदाचित प्रतिवादीच्या वतीने पुढील तारखेस निशाणी क्र.४१ वर उलटतपास घेण्यास आणि रुपये ५००/– खर्च न्यायालयात जमा करण्यास कसुर केल्यास प्रस्तुतचा अर्ज न्यायालयाच्या स्वतंत्र आदेशाशिवाय आपोआप नामंजुर समजण्यात यावा.

(४) प्रतिवादी याने पुढील तारखेपावेतो खर्चाची रक्कम रुपये ५००/– न्यायालयात जमा केल्यास ती वादीस देण्यात यावी.

(५) प्रस्तुतच्या अर्जाचा खर्च प्रतिवादी याने सोसावा.

(पंकज म. बिदादा)
दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, पाटोदा.

दिनांक:– १२.१२.२०१९.

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Order / Judgment are same word to word, as per the original Order / Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : A.D. Bavne. |
| Name of the Court | : C.J.J.D. & J.M.F.C., Patoda. |
| Date of pronouncement | : 12.12.2019 |
| Judgment / Order signed by the P. O. on | : 12.12.2019 |
| Judgment / Order uploaded on | : 12.12.2019 |